# महाराष्ट्र विधानसभा

**पाचवे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांवरील**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४**

## उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ६**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८०१, वीज**<br>**बाब क्रमांक: १५४, रूपये:- २७,५०,००,००,०००/-**<br>**श्री. अभिजीत पाटील** |
| (१) | २२ | १०० | माढा तालुक्यातील ग्रामीण भागात शेतक-यांना कृषिपंप वीज कनेक्शनची अनेक प्रकरणे प्रलंबित असून वीज कनेक्शन देणे बंद असणे, याबाबत लोकप्रतीनिधीकडून विचारणा केली असता वीज वितरण अधिकारी यांच्याकडून वीज कनेक्शन देणे बंध असल्याचे सांगण्यात येणे, वीज कनेक्शन देत नसल्याने शेतक-यांच्या पिकाला पाणी न मिळणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | २४ | १०० | मौजे अरण, ता.माढा विभागामध्ये मोठयाप्रमाणात शेती व्यवसाय करण्यात येत असून त्या ठिकाणी केवळ 8 तास वीज पुरवठा केला जात असणे, अपुऱ्या वीज पुरवठा अभावी शालेय विदयार्थ्यांना अभ्यास करण्याकरिता अडचणी येत असणे, या भागातील ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांचेही वीजेअभावी नाहक त्रास होत असणे, तसेच या भागात डीपी जळण्याचे प्रमाण अधिक असणे, त्यामुळे स्थानिक लोकप्रतीनिधीकडून या ठिकाणी 220 केव्ही चा उपकेंद्र उभारणेबाबत होत असलेली मांगणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३) | ३२ | १० | उमरेड विभागातील सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्याकरीता व सौर ऊर्जा उर्जीकरण करण्याकरीता विशेष उपाययोजना करण्यासाठी लोकप्रतीनिधी कडून एक मोठा प्रकल्प तयार करण्याची होत असलेली मांगणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५२, उद्योग**<br>**बाब क्रमांक: १५७, रूपये:- १०,००,००,००,०००/-**<br>**श्री. अमित झनक** |
| (४) | ३० | १० | वाशिम जिल्हयातील रिसोड तालुक्यात एम.आय.डी.सी. मंजूर करण्याबाबत अनेकदा मागणी होत असून यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (५) | २ | १० | भंडारा जिल्ह्यातील साकोली शहर हे नॅशनल हायवे लगत असून तालुक्यामध्ये MIDC (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) नसल्यामुळे येथील बेरोजगार युवकांचे रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात स्थालांतर बाहेर शहरात व राज्यात होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (६) | ३४ | १० | उमरेड. तालुक्यातील भिवापूर, कुही येथील औद्योगिक वसाहतींचा विस्तार व विकास वाढविण्याकरीता व येथील औद्योगिक वसाहतीला मुलभूत सुविधा व कामगारांना संरक्षण देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : १८ डिसेंबर, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर